


केल्याने होत आहे रे । आधी केलेंची पाहिजे ॥

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,अंबाजोगाई संचलित

# श्री सिध्देश्वर महाविद्यालय,माजलगाव

## • शिशिरोत्सव २०२४-२५ •

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जन्म त्रिशताब्दी वर्ष

श्री./सौ. ____________________ स.न.वि.वि.

आपणास कळविण्यात अत्यंत आनंद होतो की,आपल्या महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन मित्ती पौष कृ.१३ शके १९४६ सोमवार दि.२७ जानेवारी २०२५ रोजी संपन्न होत आहे,तरी आपण अगत्यपूर्वक कार्यक्रमास उपस्थित रहावे ही विनंती.

**उद्घाटन समारंभ**
**सकाळी १०.०० वा.**

**अध्यक्ष** ***
मा.श्री.ॲड.विश्वासजी जोशी
कार्यवाह,स्थानिक व्यवस्था मंडळ,माजलगाव

**उद्घाटक** ***
मा.श्री.डॉ.हेमंतजी वैद्य
कार्यवाह,भा.शि.प्र.सं.अंबाजोगाई

**प्रमुख पाहुणे** ***
मा.श्री.संतोषजी नारायणकर
प्रसिध्द कवी,परभणी

**प्रमुख उपस्थिती** ***
मा.श्री.चंद्रकांतजी मुळे
मुख्य समन्वयक,प्र.स.भा.शि.प्र.सं.अंबाजोगाई
मा.श्री.अमरनाथजी खुर्पे
सदस्य कें.का.भा.शि.प्र.सं.अंबाजोगाई
मा.श्री.अभयजी कोकड
अध्यक्ष,महाविद्यालय विकास समिती

**बक्षीस वितरण व समारोप सत्र**
**दुपारी ०३.०० वा.**

**अध्यक्ष** ***
मा.श्री.डॉ.सुरेंद्रजी आलुरकर
अध्यक्ष,भा.शि.प्र.सं.अंबाजोगाई

**प्रमुख पाहुणे** ***
मा.श्री.राहुलजी सुर्यतळ
पोलीस निरीक्षक,माजलगाव शहर पो.स्टे.

**प्रमुख उपस्थिती** ***
मा.श्री.प्रकाशजी दुगड
पालक तथा सदस्य,कें.क.भा.शि.प्र.सं.अंबाजोगाई
मा.श्री.सुरेंद्रजी रेदासणी
अध्यक्ष,स्थानिक व्यवस्था मंडळ,माजलगाव

**आनंद नगरी सकाळी ०८.०० वा.**
**शेलापागोटे सकाळी ११.३० वा.**
**विविध गुणदर्शन दुपारी ०४.०० वा.**

:: विनीत ::

| डॉ.रमेश गटकळ | प्रा.प्रतिभा जाधव | प्रो.डॉ.मुकुंद देवर्षी |
|---|---|---|
| स्नेहसंमेलन प्रमुख | स्नेहसंमेलन सहप्रमुख | प्राचार्य |

**स्थळ : श्री सिध्देश्वर महाविद्यालय,माजलगाव जि.बीड**

Shri Siddheshwar Mahavidyalaya Majalgaon Dist.Beed 431131 • Maharashtra

[signature]

Principal
Shri Siddheshwar Mahavidalaya
Majalgaon Dist.Beed

Scanned with OKEN Scanner

केल्याने होत आहे रे । आधी केलेची पाहिजे ॥

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई संचलित,

## श्री सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगाव.

## अहवाल स्नेहसंमेलन 2025

महाविद्यालयीन आयुष्यामध्ये सोनेरी दिवस म्हणून ज्यांचा उल्लेख करता येईल असे दिवस म्हणजेच आपल्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन शिशिरोत्सव 2025. दि. 27 जानेवारी 2025 रोजी संपन्न झाले. या संमेलनानिमित्त पुढील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. दि.-15/01/2025 रोजी निबंध लेखन स्पर्धेचे व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दि. 16/01/2025 रोजी मराठी स्वाक्षरी स्पर्धा व देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा घेण्यात आली दि. 17/01/2025 रोजी प्रश्नमंजुषा स्पर्धा व उत्स्फूर्त भाषण स्पर्धा

संपन्न झाल्या दि. 18/01/2025 रोजी सकाळी रांगोळी स्पर्धा व बिस्कीट खाणे स्पर्धा घेण्यात आल्या. दि. 20/01/2025 रोजी काव्यवाचन स्पर्धा व डिश डेकोरेशन स्पर्धा घेण्यात आल्या. 21/01/2025 रोजी रॉग स्टेटमेंट स्पर्धा व अंताक्षरी स्पर्धा घेण्यात आल्या.22/01/2025 रोजी संगीत खुर्ची स्पर्धा सकाळी घेण्यात आली आणि क्रीडा विभागाच्या वतीने 100 मीटर धावणे, 200 मीटर धावणे, 400 मीटर धावणे, 800 मीटर धावणे, कबड्डी, हॉलीबॉल , गोळा फेक, थाळीफेक ,भालाफेक इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या. दिनांक 27 जानेवारी 2025 रोजी सकाळी 7:30 वाजता महाविद्यालयीन अर्थ समितीचे अध्यक्ष मा एकनाथरावजी जाधव यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करून स्नेहसंमेलनाला सुरुवात झाली 8:00 वाजता आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते.9:00 वाजता वन मिनिट शो चे आयोजन करण्यात आले होते यामध्ये एका मिनिटांमध्ये विद्यार्थ्यांनी विविध सादरीकरण केले 10:00 वाजता स्नेहसंमेलन 2025 चे उद्घाटन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे सन्माननीय कार्यवाह डॉ. हेमंतजी वैद्य यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक कवी संतोष नारायणकर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती या उद्घाटन सत्रासाठी अध्यक्ष म्हणून ॲड. विश्वासजी जोशी होते तर प्रमुख उपस्थिती प्रा. चंद्रकांतजी मुळे,मुख्य समन्वयक प्रशासकीय समिती भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य मा. अमरनाथजी खुर्पे, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभयजी कोकड हे उपस्थित होते. उद्घाटन सत्रामध्ये प्राचार्य प्रोफेसर डॉ मुकुंद देवर्षी यांनी स्नेहसंमेलना मागची भूमिका आणि विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनातून निखळ आनंद घेण्याचा मनोदय व्यक्त केला तर उद्घाटक डॉ. हेमंत जी वैद्य यांनी विद्यार्थ्यांचे संवेदनशील मन तयार करण्यासाठी स्नेहसंमेलनाचे आवश्यकता असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना आयुष्यामध्ये आनंद उपभोगत असताना शिस्त आणि कायदा याचे पालन करून आदर्श नागरिक बनण्याचे आवाहनही केले. ग्रामीण आईचे शब्द चित्र रेखाटताना महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी संतोष नारायणकर यांनी आपल्या खास शैलीमध्ये ग्रामीण जीवनाचे संदर्भ देणारी कविता सादर करून विद्यार्थ्यांची मने जिंकली. मातीसाठी झेलावी छातीवर गोळी ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी या कवितेतून प्रबोधन करताना राष्ट्रभक्तीची

बीजे तरुण वयातच अंगीकारली पाहिजेत सशक्त आणि समर्थ युवकच देशाचे भविष्य उज्वल करू शकतात असे सांगितले. प्रा चंद्रकांत जी मुळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपण चांगला नावलौकिक असणाऱ्या महाविद्यालयाचे, संस्थेचे विद्यार्थी आहात याची ओळख समाजाला चांगल्या कार्यातून करून द्या, असा मोलाचा सल्ला दिला आणि या महाविद्यालयाशी असणारा ऋणानुबंधाचा धागा त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितला. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना ॲड. विश्वाजी जोशी यांनी विद्यार्थ्यांना समयोचित मार्गदर्शन केले स्नेहसंमेलन प्रमुख डॉ.रमेश गटकळ यांनी या सत्राचे आभार प्रदर्शन केले व उद्घाटन सत्र संपन्न झाले सकाळी 11:30 वाजता विद्यार्थ्यांच्या आवडीचा आणि जिव्हाळ्याचा विषय म्हणजे शेलापागोटे कार्यक्रम सुरु झाला दोन तास मनमुराद आनंद घेत विद्यार्थ्यांचा शेलापागोटे कार्यक्रम संपन्न झाला. यावर्षी महाविद्यालयामध्ये प्रथमच विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते जवळपास हजार ते अकराशे विद्यार्थ्यांनी अतिशय शिस्तीमध्ये भोजनाचा आस्वाद घेतला महाविद्यालयासाठी ही आनंदाची बाब होती. दुपारी 3:00वाजता बक्षीस वितरण समारंभास प्रारंभ झाला. आपल्या कौशल्याच्या बळावर अनेक विद्यार्थ्यांनी बक्षीस पात्र होण्याचा मान मिळवला. जवळपास दोनशे विद्यार्थी विविध स्पर्धेमध्ये आणि कला प्रकारांमध्ये बक्षीस पात्र ठरले. या पारितोषिक वितरण समारंभासाठी अध्यक्ष म्हणून श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक तथा भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य मा. प्रकाशजी दुगड हे उपस्थित होते तर ज्यांच्या शुभहस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले असे प्रमुख पाहुणे म्हणून माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा. राहुलजी सूर्यतळ हे उपस्थित होते. विद्यार्थी व्यसनापासून दूर राहिला तरच त्याचे भवितव्य उज्वल आहे. कुठल्याही प्रकारच्या व्यसनामध्ये विद्यार्थ्यांनी गुरफटून जाऊ नये. मोबाईल हे आपल्या हाताशी आलेले प्रभावी माध्यम आहे पण त्याचा वापर आपण आपलं भवितव्य घडवण्यासाठी करू शकतात याचाही आवर्जून उल्लेख त्यांनी केला. सायबर गुन्ह्यापासून आपण जास्तीत जास्त दूर राहिले पाहिजे. कुणाच्या भावना दुखावतील किंवा इतरांना त्रास होईल अशा कुठल्याही पोस्ट आपण समाज माध्यमावर करू नयेत असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. या सत्रामध्ये महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष मा. आभयजी कोकड, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ.मुकुंदजी देवर्षी, स्नेहसंमेलन प्रमुख, सहप्रमुख उपस्थित होते. या सत्राचे प्रास्ताविक स्नेहसंमेलन प्रमुख डॉ.रमेश गटकळ यांनी केले तर आभार स्नेहसंमेलन सहप्रमुख प्रा. प्रतिभा जाधव यांनी मानले. विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा यासाठी स्नेहसंमेलनामध्ये जाणीवपूर्वक नियोजन केले गेले. विविध गुणदर्शन या सत्रामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग होऊन सादरीकरण केले. नृत्य, गायन, शिवकालीन मर्दानी खेळ, आदी प्रकारामधून कलावंतांनी आपल्या ठिकाणी असणाऱ्या गुणाचे दर्शन घडवले. विशेषता संबोधी माने या विद्यार्थिनीने सादर केलेल्या लावणीने सर्वांची मने जिंकली. दोन तास या कलावंतांनी प्राध्यापक, पालक विद्यार्थी यांना खिळवून ठेवले.

दिवसभर मनसोक्त आनंद देणारे स्नेहसंमेलन 2025 हे संस्मरणीय ठरले. या स्नेहसंमेलनासाठी सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक बंधू- भगिनी, शिक्षकेतर कर्मचारी बंधू-भगिनी सर्वांनी सहकार्य केल्यामुळे हे स्नेहसंमेलन यशस्वी झाले.

धन्यवाद!!

🙏🙏

Scanned with OKEN Scanner

## स्नेहसंमेलन 2025 काही क्षणचित्रे व छायाचित्रे
















Scanned with OKEN Scanner








Scanned with OKEN Scanner













Scanned with OKEN Scanner








Scanned with OKEN Scanner



लोकप्रश्न
29JAN2025

# मातीसाठी लढावं, छातीवर घेऊनीया गोळी– कवी संतोष नारायणकर

**माजलगाव । वार्ताहर**

मातीसाठी लढावं, छातीवर घेऊनीया गोळी अशा आशयावर आधारित मंत्रमुग्ध कविता सादर करून सिद्धेश्वरच्या विद्यार्थ्यांना कविता वाचनाने मंत्रमुग्ध करताना वार्षिक स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी ॲड. विश्वास जोशी हे तर प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, प्रा.चंद्रकांत मुळे, अभय कोकड, शशीकिरण गडम, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, डॉ. रमेश गटकळ, प्रा. प्रतिभा जाधव उपस्थित होत्या. याप्रसंगी त्यांनी वेगवेगळ्या विषयावर आधारित कविता सादर केल्या. तू आल्यावर पाऊस येतो घेऊन हिरवे रान, तू गेल्यावर पाऊस जातो घेऊन हिरवी पाने, मामाला माझ्या होत्या दोन पोरी, एक होती काळी व एक होती गोरी, रस्ता पार करताना मागे वळून बघ, तू माहेरी गेलीस आणि घरात उंदीर झाले, तू परत आलीस आणि घराचे मंदिर झाले, ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी, नको राहूस आयुष्यात रिकामा, गुण्या गोविंदाने खावी अर्धी भाकर सुखाची, अशा वेगवेगळ्या आईवर, वडिलावर तसेच वेगवेगळ्या प्रेम कविता सादर करून त्यांनी विद्यार्थ्यांची मने जिंकली. प्रा.



चंद्रकांत मुळे म्हणाले कि, आपण वर्षभरामध्ये केलेला अभ्यासाचा थकवा घालवण्यासाठी व तुमच्या आयुष्यातील आनंद उत्सव वाढवण्यासाठी हे वार्षिक स्नेहसंमेलन महाविद्यालय आपल्यासाठी आयोजित करत असते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.विकास बोरगावकर यांनी केले तर आभार स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. रमेश गटकळ यांनी मानले. या स्नेहसंमेलनात महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रिपोर्टर
Tuesday 28-01-2025

# मातीसाठी लढावं, छातीवर घेऊनीया गोळी–कवी संतोष नारायणकर

माजलगाव(रिपोर्टर): मातीसाठी लढावं, छातीवर घेऊनीया गोळी अशा आशयावर आधारित मंत्रमुग्ध कविता सादर करून सिद्धेश्वरच्या विद्यार्थ्यांना कविता वाचनाने मंत्रमुग्ध करताना वार्षिक स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी ॲड. विश्वास जोशी हे तर प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, प्रा.चंद्रकांत मुळे, अभय कोकड, शशीकिरण गडम, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, डॉ. रमेश गटकळ, प्रा. प्रतिभा जाधव उपस्थित होत्या. याप्रसंगी त्यांनी वेगवेगळ्या विषयावर आधारित कविता सादर केल्या. तू आल्यावर



पाऊस येतो घेऊन हिरवे रान, तू गेल्यावर पाऊस जातो घेऊन हिरवी पाने, मामाला माझ्या होत्या दोन पोरी, एक होती काळी व एक होती गोरी, रस्ता पार करताना मागे वळून बघ, तू माहेरी गेलीस आणि घरात उंदीर झाले, तू परत आलीस आणि घराचे मंदिर झाले, ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी, नको राहूस आयुष्यात रिकामा, गुण्या गोविंदाने खावी अर्धी भाकर सुखाची, अशा वेगवेगळ्या आईवर, वडिलावर तसेच वेगवेगळ्या प्रेम कविता सादर करून त्यांनी विद्यार्थ्यांची मने जिंकली. प्रा. चंद्रकांत मुळे म्हणाले कि, आपण वर्षभरामध्ये केलेला अभ्यासाचा थकवा घालवण्यासाठी व तुमच्या आयुष्यातील आनंद उत्सव वाढवण्यासाठी हे वार्षिक स्नेहसंमेलन महाविद्यालय आपल्यासाठी आयोजित करत असते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.विकास बोरगावकर यांनी केले तर आभार स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. रमेश गटकळ यांनी मानले. या स्नेहसंमेलनात महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

लोकप्रश्न
29JAN2025

# विद्यार्थ्यांचे संवेदनशील मन तयार करण्यासाठी स्नेहसंमेलनाची आवश्यकता - डॉ. हेमंत वैद्य

माजलगाव । वार्ताहर

विद्यार्थ्यांचे संवेदनशील मन तयार करण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलनाची अत्यंत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन धा.शि.प्र.संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्थानिक संकुलाचे कार्यवाह ॲड. विश्वास जोशी, प्रमुख पाहुणे प्रसिद्ध कवी संतोष नारायणकर, केंद्रीय कार्यकारणी सदस्य व श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा.चंद्रकांत मुळे, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, शशीकिरण गडम, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. रमेश गटकळ, सहप्रमुख प्रा. प्रतिभा जाधव उपस्थित होत्या.




पुढे बोलताना हेमंत वैद्य म्हणाले की, स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी जे यश मिळवलेले आहे त्या सर्व विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक कौतुक केले व भविष्यातील वाटचालीस शुभेच्छाही दिल्या. अशा वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संस्काराची बीजे रुजवली जातात असे ते म्हणाले.

याप्रसंगी केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. आजचे वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांचा खास उत्सव आहे पण या उत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वास वेगळे पैलू पाडले पाहिजेत. आपल्या व्यक्तिमत्त्वास आकार देण्यासाठी हे स्नेहसंमेलन भविष्यात नक्कीच तुम्हाला उपयोगात येईल असे ते म्हणाले. याप्रसंगी मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आपण वर्षभरामध्ये केलेला अभ्यासाचा थकवा घालवण्यासाठी व तुमच्या आयुष्यातील आनंद उत्सव वाढवण्यासाठी हे वार्षिक स्नेहसंमेलन महाविद्यालय आपल्यासाठी आयोजित करत असते. अध्यक्षीय समारोप करताना एडवोकेट विश्वास जोशी म्हणाले की, अशा वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनास आकार दिला पाहिजे व या माध्यमातून वेगवेगळी कौशल्य आत्मसात करून आपल्या व्यक्तिमत्त्वास योग्य ती दिशा दिली पाहिजे असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी केले. त्यांनी याप्रसंगी संमेलन आयोजनाची भूमिका स्पष्ट केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विकास बोरगावकर यांनी केले तर आभार स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. रमेश गटकळ यांनी मानले. या स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

बुलंद आवाज
मराठवाडा साथी
epaper.marathwadasathi.com
29 Jan 2025 - Page 3

# विद्यार्थ्यांनी व्यसनाला दूर ठेवले तरच भविष्य उज्ज्वल

## - पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ

**माजलगाव / प्रतिनिधी:**

आजच्या धकाधकीच्या जीवनात व्यसनापासून दूर राहिले तर आपण करियर घडवू शकतो असे प्रतिपादन माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या समारोपात ते बोलत होते. व्यासपीठावर प्रकाश दुगड, अध्यक्ष अभय कोकड, प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी, डॉ.रमेश गटकळ, प्रा.प्रतिभा जाधव यांची यांची उपस्थिती होती. समारोप सत्रात मोहिनी पायघननसह वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा व क्रीडा



स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना मानवरांच्या हस्ते बक्षीस वितरण देऊन गौरवण्यात आले. बक्षीस वितरण समारंभानंतर बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी विद्यार्थ्यांसाठी होती. अध्यक्ष प्रकाश दुगड म्हणाले की, आजच्या तरुणांनी सोशल मीडियाचा वापर मर्यादित केला तर ते आयुष्यात सकारात्मक बदल घडवू शकतील. प्रास्ताविक स्नेहसंमेलन प्रमुख डॉ.रमेश गटकळ यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.लक्ष्मीकांत सोत्रर व डॉ.ज्ञानेश्वर गवते यांनी केले. आभार स्नेहसंमेलन सहप्रमुख प्रा. प्रतिभा जाधव (पान 7 वर.)

यांनी मानले. बक्षीस वितरण व सांस्कृतिक कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्साह मोठ्या प्रमाणात होता.

Scanned with OKEN Scanner

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार २८ जानेवारी २०२५
https://lokaarambh.com
३

# विद्यार्थ्यांचे संवेदनशील मन तयार करण्यासाठी स्नेहसंमेलनाची आवश्यकता - डॉ. हेमंत वैद्य

माजलगाव प्रतिनिधी दिनांक २७ जानेवारी २०२५ विद्यार्थ्यांचे संवेदनशील मन तयार करण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलनाची अत्यंत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन मा.शि.प्र.संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्थानिक संकुलाचे कार्यवाह अॅड. विश्वास जोशी, प्रमुख पाहुणे प्रसिद्ध कवी संतोष नारायणकर, केंद्रीय कार्यकारणी सदस्य व श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा.चंद्रकांत मुळे, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, शर्मीकिरण गडम, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. रमेश गटकळ,



सहप्रमुख प्रा. प्रतिभा जाधव उपस्थित होत्या. पुढे बोलताना हेमंत वैद्य म्हणाले की, स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी जे यश मिळवलेले आहे त्या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक कौतुक केले व भविष्यातील वाटचालीस शुभेच्छाही दिल्या. अशा वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संस्काराची बीजे रुजवली जातात असे ते म्हणाले. याप्रसंगी केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. आजचे वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांचा खास उत्सव आहे पण या उत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वास वेगळे पैलू पाडले पाहिजेत. आपल्या व्यक्तिमत्त्वास आकार देण्यासाठी हे स्नेहसंमेलन भविष्यात नक्कीच तुम्हाला उपयोगात येईल असे ते म्हणाले. याप्रसंगी मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आपण वर्षभरामध्ये केलेला अभ्यासाचा थकवा घालवण्यासाठी व तुमच्या आयुष्यातील आनंद उत्सव वाढवण्यासाठी हे वार्षिक स्नेहसंमेलन म हाविद्यालय आपल्यासाठी आयोजित करत असते. अध्यक्षीय समारोप करताना एडवोकेट विश्वास जोशी म्हणाले की, अशा वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनास आकार दिला पाहिजे व या माध्यमातून वेगवेगळी कौशल्य आत्मसात करून आपल्या व्यक्तिमत्त्वास योग्य ती दिशा दिली पाहिजे असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी केले. त्यांनी याप्रसंगी संमेलन आयोजनाची भूमिका स्पष्ट केली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विकास बोरगावकर य तर आभार स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. र यांनी मानले. या स्नेहसंमेलनाच्या मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

3

आहेत.

# मातीसाठी लढावं, छातीवर घेऊनीया गोळी - कवी संतोष नारायणकर कवी संतोष नारायणकर यांच्या कवितानी सिद्धेश्वरच्या विद्यार्थ्यांना केले मंत्रमुग्ध

माजलगाव प्रतिनिधी दिनांक २७ जानेवारी २०२५ मातीसाठी लढावं, छातीवर घेऊनीया गोळी अशा आशयावर आधारित मंत्रमुग्ध कविता सादर करून सिद्धेश्वरच्या विद्यार्थ्यांना कविता वाचनाने मंत्रमुग्ध करताना वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनास प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्थानिक शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह अॅड. विश्वास जोशी तसेच मंचावर केंद्रीय कार्यकारणी सदस्य व स्थानिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, प्रशासकीय अधिकारी प्रा.चंद्रकांत मुळे, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, शर्मीकिरण गडम, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. रमेश गटकळ, सहप्रमुख प्रा. प्रतिभा जाधव उपस्थित होत्या. याप्रसंगी त्यांनी वेगवेगळ्या विषयावर आधारित कविता सादर केल्या. तू आल्यावर पाऊस येतो घेऊन हिरवे रान, तू गेल्यावर पाऊस जातो घेऊन हिरवी पाने, मामाला माझ्या होत्या दोन पोरी, एक होती काळी व एक होती गोरी, रस्ता पार करताना मागे वळून बघ, तू माहेरी गेलीस आणि घरात उंदीर झाले, तू परत आलीस आणि घराचे मंदिर झाले, ज्याची त्याची पोळी त्याची वाजवावी टाळी, नको राहूस आयुष्यात रिकामा, गुण्या गोविंदाने खावी अर्धी भाकर सुखाची, अशा वेगवेगळ्या आईवर, वडिलावर तसेच वेगवेगळ्या



प्रेम कविता सादर करून त्यांनी विद्यार्थ्यांची मने जिंकली.याप्रसंगी स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करताना उद्घाटक म्हणून मा.शि.प्र.संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य म्हणाले की, विद्यार्थ्यांचे संवेदनशील मन तयार करण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलनाची अत्यंत आवश्यकता असते.स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी जे यश मिळवलेले आहे त्या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक कौतुक केले व भविष्यातील वाटचालीस शुभेच्छाही दिल्या. अशा वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संस्काराची बीजे रुजवली जातात असे ते म्हणाले. याप्रसंगी केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. आजचे वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांचा खास उत्सव आहे पण या उत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वास वेगळे पैलू पाडले पाहिजेत. आपल्या व्यक्तिमत्त्वास आकार देण्यासाठी हे स्नेहसंमेलन भविष्यात नक्कीच तुम्हाला उपयोगात येईल असे ते म्हणाले. याप्रसंगी मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे हे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आपण वर्षभरामध्ये केलेला अभ्यासाचा थकवा घालवण्यासाठी व तुमच्या आयुष्यातील आनंद उत्सववाढवण्यासाठी हे वार्षिक स्नेहसंमेलन महाविद्यालय आपल्यासाठी आयोजित करत असते. अध्यक्षीय समारोप करताना एडवोकेट विश्वास जोशी म्हणाले की, अशा वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनास आकार दिला पाहिजे व या माध्यमातून वेगवेगळी कौशल्य आत्मसात करून आपल्या व्यक्तिमत्त्वास योग्य ती दिशा दिली पाहिजे असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी केले. त्यांनी याप्रसंगी संमेलन आयोजनाची भूमिका स्पष्ट केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विकास बोरगावकर यांनी केले तर आभार स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. रमेश गटकळ यांनी मानले. या स्नेहसंमेलनात महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

| | |
|---|---|
| स्नेहसंमेलन प्रमुख | प्राचार्य |
| प्रा.डॉ.रमेश गटकळ | प्रो.डॉ.मुकुंद देवर्षी |

Scanned with OKEN Scanner

# स्नेहसंमेलन

२०२४-२०२५



पुण्यश्लोक
अहिल्यादेवी होळकर
त्रिजन्मशताब्दी वर्ष
२०२४-२५

## श्री सिध्देश्वर महाविद्यालय माजलगाव

सोमवार, दि.२७ जानेवारी २०२५

